# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. २०/०१/२०१५**

आज मंगळवार दि. २०/०१/२०१५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ५ दि. १५/०१/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ९) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १०) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १२) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १३) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १४) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १५) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १८) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १९) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २०) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २१) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २२) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २३) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २४) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २५) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २६) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २७) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २८) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २९) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३१) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३२) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३३) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३४) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३५) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३६) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३७) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३८) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३९) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४०) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४१) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४२) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४३) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४४) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४५) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४६) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४७) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४८) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ४९) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५०) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५१) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५२) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५३) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५४) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५५) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५६) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ५७) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५८) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ५९) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६०) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६१) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६२) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६४) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६५) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६६) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६७) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ६८) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६९) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७०) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७१) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७२) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७३) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७४) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७५) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ७६) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७७) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ७८) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ७९) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८०) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| २) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| ३) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ४) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ५) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ६) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ७) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ८) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ९) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| १०) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ११) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| १२) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १३) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| १४) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरीता सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सदस्या, अधिकारी वर्ग व पत्रकार बंधु यांचे स्वागत करीत आहे. आजची सभा महापालिकेच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेकरीता आयोजित केलेली आहे. तरी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी हि विनंती. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष मा. महासभा मंगळवार दि. २०/०१/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०५, दि. १५/०१/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ६२, सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मूळ अर्थसंकल्पास मंजूरी देणेबाबत.

**प्रशांत केळुसकर :-**

मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभागृह नेते, मा. विरोधी पक्ष नेते, मा. आयुक्त, उप-आयुक्त, सन्मानीय नगरसेवक/नगरसेविका, अधिकारी व कर्मचारी वर्ग, सभागृहाचे गॅलरीतील उपस्थित नागरीक व पत्रकार बंधुनो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक आपणासमोर सादर करताना अतिशय आनंद होत आहे. दि.१७.०२.२०१४ रोजी मा. आयुक्तांनी मा. स्थायी समितीस सादर केलेल्या अंदाजपत्रकावर मा. स्थायी समितीमध्ये लेखाशीर्षनिहाय चर्चा करून अपेक्षित उत्पन्नात ज्या लेखाशीर्षाखाली वाढ करणे अपेक्षित होते,त्यामध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे.तसेच अनावश्यक खर्च कमी करून विकास कामांवर भर देण्यात आलेला आहे.मा.आयुक्तांनी अंदाजपत्रक सादर केल्यांनंतर शासनाकडून येणे असलेल्या अनुदानाबाबत मा.आयुक्त प्रयत्नशील होते.मा.आयुक्तांना यश आल्यामुळे अशा अनुदानांची नोंद मा.स्थायी समितीने अंदाजपत्रकात घेतलेली आहे. या शहरास आवश्यक असलेल्या पायाभूत सेवा पुरविण्याचा आमचा मानस आहे. यास्तव अंदाज पत्रकात मोठ्या प्रमाणात विकास कामे करणे तसेच शहराची अत्यंत निकडीची गरज म्हणजे पाणीपुरवठा यासाठी नवीन पाणीयोजना यामध्ये भरीव तरतुद करण्यात आली आहे..या व्यतिरिक्त वृध्दाश्रम बांधणे,ड्रामा थिएटर बांधणे,महिलांचे सक्षमीकरण करणे तसेच सुरू असलेल्या योजना पुर्णत्वास नेण्यासाठी अंदाज पत्रकात आवश्यक ती तरतूद करण्यात आलेली आहे. अंदाजपत्रकाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही व्हावी अशी आशा बाळगतो.मा. स्थायी समितीने सादर केलेल्या सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकास मा.महासभेची एकमताने मंजुरी मिळावी ही विनंती.

अंदाजपत्रक तयार करतांना मा. स्थायी समितीचे सर्व सदस्य, मा. आयुक्त, मा. अतिरीक्त आयुक्त, मा. उपायुक्त, अधिकारी, कर्मचारी आणि लेखा शाखेचे जे मोलाचे सहकार्य लाभले. ह्या सर्वांचे मी आभार मानतो. धन्यवाद.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी सभापतीनी चांगले बजेट मांडले आहे. सर्व गोष्टीचा विचारपूर्वक स्टॅन्डिंग कमिटीने बजेट मांडले आहे. म्हणून महासभेच्या वतीने मी ठराव मांडत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मा. आयुक्त सो. यांनी मा. स्थायी समितीसमोर मंजूरीसाठी सादर केले. दि. २६/०२/२०१४ रोजी आयोजित केलेल्या मा. स्थायी समितीमध्ये सविस्तर चर्चा करुन ठराव क्र. १०७ प्रमाणे अंदाजपत्रकात काही दुरूस्त्या करून मा. स्थायी समितीने सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये आयुक्तांनी सुचविलेले अपेक्षित उत्पन्न व खर्चाच्या बाबीमध्ये वाढ व घट करुन सर्वानुमते ठराव मंजूर केले.

मिरा भाईंदर महानगरपालिका सुचना क्र. १०५ दि. १५/०१/२०१५ नुसार विशेष महासभा दि. २०/०१/२०१५ रोजी भरविण्यात आली. सदरच्या सभेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण क्र.२ च्या “ल” ला अधीन राहून कोणताही प्रस्ताव सभेसमोर आलेला नसल्यामुळे मा. स्थायी समिती दि. २६/०२/२०१४, ठराव क्र. १६०, सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकाला कोणतीही दुरुस्ती न करता सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकास ही सभा मंजूरी देत आहे.

**सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रक**

| तपशिल | २०१३-१४ (सुधारित अंदाज) | २०१४-१५ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक “अ” + “क” + “अग्निशमन” + “महिला व बालकल्याण समिती” + “अंध व अपंग” + “JNNURM” + “P” +“वृक्षप्राधिकरण” + शिक्षण मंडळ + = एकूण जमा | ९१००४.२७ | १२३७५०.७३ |

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रक "अ" + "क" + "अग्निशमन" + "महिला व बालकल्याण समिती" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" +"वृक्षप्राधिकरण" + शिक्षण मंडळ + = एकूण खर्च | ७९६०७.१२ | १२३७२५.७८ |
| **अखेरची शिल्लक** | **११३९७.१५** | **२४.९५** |

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मा. आयुक्त सो. यांनी मा. स्थायी समितीसमोर मंजूरीसाठी सादर केले. दि. २६/०२/२०१४ रोजी आयोजित केलेल्या मा. स्थायी समितीमध्ये सविस्तर चर्चा करुन ठराव क्र. १०७ प्रमाणे अंदाजपत्रकात काही दुरूस्त्या करून मा. स्थायी समितीने सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये आयुक्तांनी सुचविलेले अपेक्षित उत्पन्न व खर्चाच्या बाबीमध्ये वाढ व घट करुन सर्वानुमते ठराव मंजूर केले.

मिरा भाईंदर महानगरपालिका सुचना क्र. ०५ दि. १५/०१/२०१५ नुसार विशेष महासभा दि. २०/०१/२०१५ रोजी भरविण्यात आली. सदरच्या सभेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण क्र.२ च्या "ल" ला अधीन राहून कोणताही प्रस्ताव सभेसमोर आलेला नसल्यामुळे मा. स्थायी समिती दि. २६/०२/२०१४, ठराव क्र. १५९, सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकाला कोणतीही दुरुस्ती न करता सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकास ही सभा मंजूरी देत आहे.

**सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रक**

| तपशिल | २०१३-१४ (सुधारित अंदाज) | २०१४-१५ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" = एकूण जमा | १२२७.३१ | ५७०७.६४ |
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" = एकूण खर्च | ८२७.२१ | ५६९२.१६ |
| **अखेरची शिल्लक** | ४००.१० | १५.४८ |

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी समितीने २० फेब्रुवारी २०१४ ला बजेट मंजूर केल होत. ते वेळेत महासभेच्या विषयपटलावर आले नाही. आणि मा. आयुक्तांच्या अंदाजाप्रमाणे विविध कामे झाली म्हणजे एका साईडला स्थायी समितीने केलेला अंदाजपत्रक दुसऱ्या बाजूने मा. आयुक्तांनी केलेले अंदाजपत्रकाप्रमाणे कामे झालेली आहेत. मधल्या काळात मोठ्या प्रमाणात रिॲप्रोप्रिएशन झालेले आहे. आणि शहराची गरज बघता मा. आयुक्तांनी आपल्या माध्यमातून महासभेपूढे विषय सादर करण्यात आले होते की, शहराच्या विकासासाठी बदल करणे गरजेचे आहे. म्हणूनही सभा मूळ अंदाजपत्रकात ठरावाच्या माध्यमातून बदल सूचवत आहोत.

**लेखाशिर्ष निहाय बदल करावयाचा रकमा** **रू.लाखात**

| अ.क्र | लेखाशिर्ष | मा.महासभा अंदाज (२०१४-१५) | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक स्मशानभुमी व दफनभुमी दुरूस्ती | ६५.०० | ३३ |
| २ | मनपा सार्वजनिक इमारती दुरूस्ती व इतर कामे | ८०.०० | ३५ |
| ३ | सार्वजनिक रस्ते देखभाल / दुरूस्ती/पुर्नः पृष्ठीकरण | ३७००.०० | ३५ |
| ४ | सार्व.शौचालय व मुतारी दुरूस्ती | २३०.०० | ३५ |
| ५ | सर्वधर्मिय उत्सव मंडप / लाईट व इतर व्यवस्था | ३००.०० | ३५ |
| ६ | गटारे दुरूस्ती झाकणे बसविणे | ३५०.०० | ३५ |
| ७ | सार्वजनिक इमारती/ सिग्नल (विद्युत विजबिल) | १५०.०० | ३९ |
| ८ | मार्केट बांधकाम | १४०.०० | ४१ |
| ९ | नविन रस्ते बांधकाम | १५००.०० | ४२ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | नविन गटारे / नाले बांधकाम | ८५०.०० | ४२ |
| ११ | वाचनालय विकास | १५.०० | ४२ |
| १२ | जेसलपार्क सब-वे / पोच रस्ते | १८५०.०० | ४२ |
| १३ | त्रयस्थ लेखापरीक्षण फी | ५३.०० | ४२ |
| १४ | स्पोटर्स क्लब व इतर कामे | ७००.०० | ४२ |
| १५ | भाईंदर (पूर्व/प.),मिरारोड स्टेशन बाहेर सुशोभिकरण करणे | २५०.०० | ४३ |
| १६ | स्टेडीयम/ क्रीडा संकुल विकसित करणे | ७५.०० | ४४ |
| १७ | कम्युनिटी सेंटर | १००.०० | ४४ |
| १८ | भाईंदर (प) रुग्णालय बांधकाम (टेंबा हॉस्पिटल) | ३००.०० | ४१ |
| १९ | सिग्नल यंत्रणा / सी.सी.टी.व्ही.बसविणे (नविन विद्युत कामे) (रेल्वे स्टेशन /स्मशान भुमी/प्रभाग कार्यालय ) | ५०.०० | ४४ |
| २० | नविन स्ट्रीट लाईट/हायमस्ट (नविन विद्युत कामे) | २०.०० | ४४ |
| २१ | विजबिलाचा खर्च(पथदिवे)(विद्युत विजबिल) | १८००.०० | ३९ |
| २२ | सार्व. इमारती/ सिग्नल /जनरेटर/सी.सी.कॅमेरा दुरूस्ती (विद्युत दुरूस्ती) | ३५.०० | ३९ |
| २३ | सार्वजनिक इमारती (नविन विद्युत कामे) | २५.०० | ४४ |
| २४ | ऐतिहासिक स्मारके | २५.०० | ४२ |
| २५ | सभापती स्वेच्छा निर्णय निधी | १००.०० | ३७ |
| २६ | दशक्रीया विधी व इतर शेड बांधणे | १७५.०० | ४३ |
| २७ | वॉर्ड साफसफाई | ४९२०.०० | ३१ |
| २८ | वैद्यकीय अस्थायी आस्थापना | १५०.०० | ३२ |
| २९ | रुग्णालय फर्निचर / उपकरणे खरेदी करणे | ४००.०० | ४१ |
| ३० | एकात्मिक डास निर्मुलन योजना | २३०.०० | ३१ |
| ३१ | पाणी बील | ३७८०.०० | ४९ |
| ३२ | पंपींग व संपगृह विज देयक बिल | ४७०.०० | ५० |
| ३३ | टँकर भाडे | २८०.०० | ५० |
| ३४ | मलनिःसारण विज देयक | ४००.०० | ५० |
| ३५ | पा.पु. साहित्य खरेदी | १७०.०० | ५१ |
| ३६ | नविन जलवाहिनी टाकणे | ११००.०० | ५१ |
| ३७ | नविन अतिरीक्त पाणी पुरवठा | ४३५०.०० | ५१ |
| ३८ | रस्ता नुकसान भरपाई (जमा) | ४२००.०० | १८ |
| ३९ | शाळा इमारत दुरूस्ती,निगा (शिक्षण) | १२०.०० | ५ |
| ४० | संगणक प्रशिक्षण (शिक्षण) | ४४.०० | ५ |
| ४१ | वर्ग सुरू करणे /शैक्षणिक साहित्य (शिक्षण) | १.०० | ५ |

## आर्थिक व प्रशासकिय मंजुरी

| अ. क्र. | कामाचे | मुळ मान्यता | सुधारीत मान्यता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | गायमुख ते चेणा दरम्यान सध्यांच्या जलवाहिनीस समांतर १३५० मि.मी. व्यासाची एम.एस. पाईप लाईन टाकणे. | रू. १७,८०,५४,६७५/- | रू. २२,०२,२८,७१२/- | मंजूर निविदा अंदाजपत्रकापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा व भाववाढ |
| २ | हटकेश ते शामराव विठ्ठल बँकेपर्यंत १०६७ मि.मी. व्यासाची एम.एस. पाईप लाईन टाकणे | रू. ६,०३,६७,२१६/- | रू. ७,००,०२,६८८/- | मंजूर निविदा अंदाजपत्रकापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा व भाववाढ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका वाढीव पाणी पुरवठा योजना (एम.आय.डी.सी. स्त्रोत) | रू. २६९,६२,००,०००/- | - | |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत संकल्पचित्र व संकल्पन तयार करून मालमत्तेची मलःनिस्सारण जोडणी करणे | रू. २२,४५,००,०००/- | रू. ५४,४०,६३,७१५/- | सदरच्या कामाची निविदा ही सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार मागविण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे दरापेक्षा १४५% जास्त दराची आहे. |

अ.क्र. १,२,३ करीता वार्षिक अंदाजपत्रक सन २०१४-१५ पृ. क्र. ५१, बाब क्र. ०६ नवीन अति. पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षकाखाली तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी अ.क्र. १ व २ या कामांना सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अ.क्र. ३ वाढीव पाणी पुरवठा योजना एकुण खर्च रू. २६९.६२ कोटी खर्चास सदर योजना शासनाच्या नगरोत्थान अभियांनातंर्गत मंजुरीसाठी शासनास पाठविणेसाठी, तसेच या योजनेंतर्गत ५० टक्के रक्कम शासकीय अनुदान आहे व ५० टक्के रक्कम मनपा हिस्सा आहे. मनपा हिस्सापैकी ८० टक्के कर्ज स्वरूपात निधी उभा राहवयाचा आहे व २० टक्के मनपाच्या खर्चातून करावयाचा आहे.

महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात सन २०१४-१५ पृ.क्र. ६१ अ.क्र. ०१ जेएनएनयुआरएम मनपा हिस्सा या लेखाशिर्षखाली अ.क्र. ०४ मधील कामास सुधारीत प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

## कामाची यादी

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्ता ते कनकिया रस्ता जोडणारा ३०.०० मीटर डी.पी रस्ता तयार करणे व गटारे बांधणे (तिवारी कॉलेज समोरील) | रु. ७,००,५०,६००/- |
| २ | हटकेश येथील श्री. ॲव्हेन्यु ते वेस्टर्न पार्क (स.क्र. ९० ते १३२, घोडबंदर) पर्यतचा रस्ता तयार करणे व गटारे बांधणे | रु. ५,८१,५८,०००/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १० मधील ओम पुष्पक ते मणीभद्र इमारती पर्यत नाल्याची पुर्नबांधणी करणे | रु. ४०,२५,५५५/- |
| ४ | भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल इमारत बांधणे. मुळ सुधारीत अंदाजपत्रक<br>सुधारीत अंदाजपत्रक<br>(सदर सुधारीत अंदाजपत्रकानुसार काम मुळ कंत्राटदाराकडुन काम करुन घेण्यात यावे. सदर काम तातडीने पुर्ण करावयाचे असल्याने मुळ कंत्राटदारास काम सब लेट करण्यास परवानगी देण्यात येत आहे.) | रु. १३,८१,८५,५७५/-<br>रु. २२,७८,२५,५००/- |
| ५ | टेंबा हॉस्पीटल मध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणे, हाऊसकिपींग, लॉड्री, वैद्यकिय यंत्र सामुग्री खरेदी करणे इत्यादीसाठी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देणे | रु.२,००,००,०००/- |

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मुळ अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मा. स्थायी समितीने मंजूर केलेले सुधारीत व मुळ अंदाजपत्रकात काही दुरुस्त्या करुन मा. महासभा सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ च्या मुळ अंदाजपत्रकास ही सभा मंजुरी देत आहे.

| तपशिल | २०१३-१४ (सुधारित अंदाज) | २०१४-१५ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" = एकूण जमा | १२२७.३१ | ५७०७.६४ |
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" = एकूण खर्च | ८२७.२१ | ५६९२.१६ |
| **अखेरची शिल्लक** | **४००.१०** | **१५.४८** |

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मा. आयुक्त सो. यांनी सादर केलेल्या मुळ अंदाजपत्रकात काही दुरूस्त्या करून मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकात सुधारित व मूळ अंदाजपत्रकामध्ये वरीलप्रमाणे सुधारणा करून सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सन २०१३-१४ चे सुधारित अंदाज व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रक**

**(आकडे लाखात)**

| तपशिल | २०१३-१४ (सुधारित अंदाज) | २०१४-१५ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| **एकूण जमा** | ९१००४.२७ | १२५४५०.७३ |
| **एकूण खर्च** | ७९६०७.१२ | १२५४२५.७८ |
| **अखेरची शिल्लक** | ११३९७.१५ | २४.९५ |

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर आपल्या परवानगीने बोलतो. मा. स्थायी समिती सभापती ह्यांनी आपल्या भाषणामध्ये त्यांनी स्पष्ट उल्लेख केला. स्थायी समितीने बजेट प्रस्तावित केलेले वाढ घट जे काय त्यांना सुधारणा करायची ती आयुक्तांनी ९५ खाली बजेट सादर केल्यानंतर स्थायी समितीच्या अधिकारात त्यांनी स्थायी समितीला जे योग्य वाटेल त्याप्रकारे त्यांनी खर्चामध्ये जी काय वाढ, घट करुन शिलकीची रक्कम प्रस्तावित महासभेच्या मंजूरीसाठी केली आहे. मला सचिव महोदयांना एक प्रश्न विचारायचा आहे की, महासभेचा विषयपत्रिका आल्यानंतर दुसरा कोणताही विषय "ज" च्या खाली आलेला नाही. कोणी प्रस्तावित केलेला नाही किंवा आम्ही कोणी केलेला नाही कदाचित माझ्याकडे पोहोचला नसेल "ज" च्या माध्यमातून कोणता प्रस्ताव तुमच्याकडे आला आहे का?

**नगरसचिव :-**

"ज" चा प्रस्ताव आलेला नाही.

**जुबेर इनामदार :-**

"ज" चा प्रस्ताव आलेला नसेल तर ह्या अर्थसंकल्पामध्ये कुठलेही बदल ह्या सभेमध्ये घडवता येईल का?

**नगरसचिव :-**

महासभेचे अधिकार १०० कलमामध्ये नमूद केलेले आहेत. ते मी पहिल्यांदा वाचून दाखवत आहे. अर्थसंकल्पीय अंदाज अंतिम स्विकृती कलम ९९ अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टीच्या अधीन राहून महानगरपालिका अर्थसंकल्प अंदाज अ किंवा यथाशक्ती अर्थसंकल्प अंदाज "क" स्थायी समितीकडे "ब" अर्थसंकल्पीय अंदाज व परिवहन समितीकडे अधिक विचारासाठी परत पाठविता येतील किंवा तिला सादर केलेले अर्थसंकल्पीय अंदाज किंवा कोणतेही सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज जशेच्या तसे किंवा इष्ट वाटतील तसे फेरफार त्यात करुन स्विकृत करता येतील अशी तरतूद आहे.

**जुबेर इनामदार :-**

१०० मध्ये आपली ही सभागृह जो चालतो महानगरपालिका जे सभा कामकाज चालते त्या अधिनियमाच्या कुठल्या कलमाअंतर्गत कुठल्या अधिनियमाच्या अंतर्गत चालतो त्याची माहिती द्या.

**नगरसचिव :-**

आपले सभाकामकाज महानगरपालिका अधिनियम १९४९ खाली चालते.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्या आतमध्ये कोणत्या कलमाना अधिन राहून आपण सभा कामकाज चालवतो. त्याच्यामध्ये अर्थसंकल्पाची तरतूद काय ती सांगा. परिशिष्ट २ मध्ये मी तुम्हाला स्पष्ट करुन दाखवतो. परिशिष्ट २ प्रकरण २ त्याच्यामध्ये "ल" चा जो प्रस्ताव आहे किंवा अधिनियम आहे. अधिनियमाचा कलम आहे "ल" तो वाचून दाखवा

**नगरसचिव :-**

"ल" च्या अधिनियमाचे वाचन करतो. तातडीच्या प्रसंगी मागणीवरुन बोलावलेल्या सभेत कोणत्याही सभेतील अर्थसंकल्पीय अंदाजावरील चर्चेच्या वेळी, ज्या कामकाजासाठी तातडीची सभा बोलावण्यात आली आहे त्या कामकाजाशी किंवा यथास्थिती, अर्थसंकल्पीय अंदाजाशी ज्याचा प्रत्यक्षपणे संबंध नाही असे कोणतेही कामकाज चालवता येणार नाही आणि स्थायी समितीने जे कर लादण्याचे योजले आहे त्या करात किंवा

परिवहन समितीने जे भाडे किंवा आकार बसवण्याचे योजिले आहे त्या भाड्यात किंवा आकारात ज्यामुळे कोणताही बदल किंवा अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या कोणत्याही बाबतीत ज्यामुळे वाढ किंवा घट होईल असा कोणताही प्रस्ताव ज्या कोणत्याही सभेत अशा अर्थसंकल्पीय अंदाजावर विचार चालू असेल अशा सभेत मांडता येणार नाही. मात्र असा प्रस्ताव खंड (आय) अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या सभेच्या नोटिशीत किंवा खंड (ज) अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या पुरक घोषणेत तशी घोषणा असल्यास, विनिर्दिष्ट करण्यात आला असेल तर, किंवा तहकुब सभेच्या बाबतीत, खंड (म) च्या परंतुकात निर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तीपैकी प्रत्येक शर्त पूर्ण करण्यात आली असेल तर, असा प्रस्ताव अशा सभेत मांडता येईल किंवा त्यावर चर्चा करता येईल.

**जुबेर इनामदार :-**

ह्याचे स्पष्टीकरण करा. एका बाजूला १०० आणि १०० "अ" तो वादग्रस्त कारण १०० ला १०० "अ" आल्यानंतर ह्या सभेची गरजच नव्हती. मात्र राज्यशासनाने पाठवलेले पत्र त्याला अधीन राहून आपण ही सभा इथे बोलवली आहे. मात्र प्रकरण २ चा "ल" ह्यात स्पष्ट उल्लेख आहे की कुठलीही वाढ किंवा घट करायची असल्यास करता येत नाही असे बोलत नाही. १०० बोलतो करा करायची पध्दत प्रकरण २ च्या "ल" मध्ये स्पष्ट आहे. वाढ किंवा घट करायची असल्यास "ज" च्या प्रस्तावाच्या माध्यमातून तुम्हाला करता येईल. त्याला कारण आहे जो काही प्रस्ताव मांडणार आहे त्याची माहिती दुसऱ्या सदस्यांना असावी त्या कारणास्तव हा अधिनियम उल्लेखण्यात आली आहे. हा चूकीचा आहे का? ह्याच्याप्रमाणे तुमचा अभिप्राय काय असणार. काय केले पाहिजे. "ल" प्रमाणे कामकाज चालले पाहिजे की नाही.

**नगरसचिव :-**

प्रथम अधिनियम त्याच्यावर अवलंबून हे उपविधी तयार केलेले असतात.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, जुबेर इनामदारांनी जो मांडलेला आहे, १०० ही बरोबर आहे आणि "ल" ही बरोबर आहे. ह्याच्यात काही दुमत नाही आहे. १०० मध्ये जे सचिवांनी वाचन केले त्यामध्ये म्हटले आहे त्या विषयाला सोडून म्हणजे विशेष तातडीने सभा बोलवली त्याच्यावर इतर कोणतीही चर्चा करता येणार नाही किंवा कोणताही निर्णय घेता येणार नाही. दुसर जे वाचन केले त्यामध्ये कुठलाही टॅक्सेशन कमी करायचे असेल एखादा नविन टॅक्स लावला आणि महासभेला वाटला असेल तो टॅक्स कमी करायचा आहे. तर कुठलाही कर किंवा दर हे बदल करता येत नाही आणि १०० प्रमाणे अर्थसंकल्प आपण एवढा तरी विचार केला. महासभा सर्वोच्च स्थान आहे. त्याठिकाणी बदल नाही होणार तर कुठे बदल होणार.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही कुठे बोललो बदल झाले नाही पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही कुठलाही कर किंवा दर हे बदल केले नाही त्यापुढे जाऊन सांगतो आपण बजेट सादर केलेले आहे. ह्या बजेटमध्ये सादर केलेले आहे. त्यामध्ये ऑलरेडी फेरबदल करुन टाकले मधल्या काळात स्थायी समितीने सुचवले आहेत ती फिगर टॅली होत नाही. एवढ्या बदलची लिस्ट का वाचली कारण आयुक्तांनी केलेले अंदाजपत्रक आणि स्थायी समितीने टॅलीच होत नाही. उदा. मी सांगितले स्थायी समितीप्रमाणे मंजूर तर होणारच नाही. फिगर उलटसुलट केलेली आहे. वृक्षप्राधिकरणने आयुक्तांनी नविनसाठी २ करोड रु. सुचवले आम्ही ८ करोड सुचवले उदा. सांगतो. आयुक्तांनी ८ करोड खाली सुचवले ते वापरुन टाकले. आम्ही ते मान्य केले तर आमचे फिगर आहे ८ करोड आयुक्तांचे २ करोड कसे होईल. मोठ्या प्रमाणात तफावत आहे. मधल्या काळात रिॲप्रोप्रिएशन झाले आहे आणि महासभेला पूर्ण अधिकार आहे "ल" प्रमाणे कर आणि दर एखाद्या वेळी केले असेल तर महासभेला आज बजेटमध्ये वाटल आम्ही इन्कम कमी करतो आणि टॅक्स कमी करतो तसे होणार नाही. आम्हाला वाटल टॅक्स वाढवायचा इन्कम वाढवायचे तर तेही करता येणार नाही. "ल" चे तेवढच आहे. त्या पलिकडे मॅडम आम्ही निवेदन करतो की आम्ही ठराव मांडलेला आहे. आम्हाला कायद्यातली तरतूद माहित आहे. त्याप्रमाणे ध्रुवकिशोर पाटील यांनी ठराव मांडलेला आहे. आमचे म्हणणे आहे आम्ही ठराव मांडला आम्ही काही ठरावात बदल करत नाही. शेवटी त्यावर निर्णय घ्यावे. गरज पडल्यास त्यावर मतदान करुन घ्यावे. प्रशासनाला जो योग्य वाटेल तो निर्णय घ्यावा.

**जुबेर इनामदार :-**

निर्णय घ्यायच्या अगोदर सन्मा. विरोधी पक्षनेता ह्यांनी त्यांच्या भाषणामध्ये बरेच काही पुर्नःनियोजन झाले असे सांगितले. आयुक्तांनी पुर्नःनियोजन केले तर कोणत्या आधारावर केले. त्यांनी दिलेल्या बजेटच्या अंदाजावर ९५ खाली अधिनियम ९५ खाली जे त्यांनी स्थायी समितीला प्रस्तावित केले होते. त्याच आकड्यामध्ये त्यानी पुर्नःविनियोजन केले आहे. स्थायी समितीत कोणत्याही आकड्यामध्ये पुर्नःविनियोजन करण्यात आले नाही असे मा. आयुक्तांनी केले असेल तर ते नियमबाह्य ठरेल.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम मी खुलासा करतो. उदा. ५०० कोटी रु. मा. आयुक्तांनी पाण्यासाठी राखीव ठेवलेले. स्थायी समितीने पण ठेवले होते. स्थायी समितीने ते बजेट मान्य झालेच नव्हते. मधल्या काळात आयुक्तांनी ते ५०० चे एकच अकाऊंट असल्याने ते स्थायी समितीला अधिकार आहेत ते ५ कोटी दुसरीकडे

डायव्हर्शन केले म्हणजे आता ४५ आहे. आम्ही ५० करतो जिकडे ४५ कसे होणार बदल केल्याशिवाय ह्या ठरावात नाही मांडणार तर आयुक्तांनी सांगितले तर ४५ आम्ही बोलतो ५० मूळ ॲक्च्युअल रक्कमच नाही. ५ कोटी दुसरीकडे वर्ग करुन खर्च केले. ते महासभेमध्ये सुधारायला नको.

**जुबेर इनामदार :-**

सुधारण्याचे प्रोव्हिजन होते. तुम्ही तेवढा अभ्यास केला होता तर ते घेतल पाहिजे होत. ‘‘ल’’ च्या प्रस्तावाच्या माध्यमातून.

**भगवती शर्ता :-**

सचिव साहेब तुम्ही सांगा हे फेरबदल आम्ही करु शकतात का?

**नगरसचिव :-**

फेरबदल करायचे तर त्याची प्रोसीजर कशी आहे.

**भगवती शर्मा :-**

ती प्रोसीजर आतापर्यंत केली का?

**नगरसचिव :-**

१०० मध्ये अंतिम स्विकृती कशी द्यायची ते महासभेने ................

**भगवती शर्मा :-**

आम्ही नियमची चर्चा करतो ‘‘ल’’ प्रमाणे करता येईल का?

**नगरसचिव :-**

‘‘ल’’ ची प्रोसीजर वेगळी आहे ती ‘‘ज’’ खाली प्रस्ताव आणून त्याची करायची अशी प्रोसीजर आहे.

**भगवती शर्मा :-**

जर ह्यांनी चेंज करायची असेल तर त्याप्रमाणे त्यांना प्रोसीजर फॉलो करायला लागेल ना.

**नगरसचिव :-**

सभागृह सर्वश्रेष्ठ आहे सभागृहाने त्याच्यावर निर्णय घ्यावा. ‘‘ज’’ प्रमाणे कोणताही प्रस्ताव आला नाही.

**भगवती शर्मा :-**

मग हे नियमाप्रमाणे नाही.

**नगरसचिव :-**

जे कायद्यात आहे ते वाचून दाखवले.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्तांना खुलासा करायला सांगा. अंमलबजावणी त्यांना करायची आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही सविचांना विचारतो ह्या नियमाप्रमाणे फेरबदल करता येईल का?

**नगरसचिव :-**

‘‘ल’’ ची प्रोसीजर दिलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही कर आणि दर .............................

**भगवती शर्मा :-**

फेरबदल बद्दल प्रोसीजर पूर्ण केलेले नाही. म्हणून फेरबदल करता येत नाही.

**नगरसचिव :-**

मी १०० ची तरतूद वाचून दाखवली आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम ह्या सभागृहात जी चर्चा चालली आहे. अर्थसंकल्प सादर झाले आहे अर्थसंकल्प फिगर ठरली आहे. अर्थसंकल्पामध्ये कुठेही करवाढ करत नाही किंवा कोणाला सवलत देऊन त्यातली फिगर कमी करत नाही. जे हेड आहेत आणि जो मधला काळ गेला तो गुंतागुंतीचा तुम्हालाही माहित आहे. तुम्ही सहमत आणि आयुक्तांच्या खुर्चीत बसले आहे त्यांना त्यातून मार्ग काढायला लागेल. आपण कोणतीही फिगर बदलत नाही. आपण हेड बदलतो. ह्या खर्चामध्ये इथे जो खर्च दाखवला आहे तो कमी पडेल म्हणून ही सभा त्याला मान्यता देते. इकडचा खर्च उचलला तिकडे ठेवला. तिकडचा खर्च उचलला एवढच आहे. किस काढायचा असेल तर जुबेर साहेब काढू शकतात. जे नियमानुसार बोलायचे आहे तर आपण सभागृह संध्याकाळी ७.०० पर्यंत चालवू या. आपल्याला सभा संपवायची घाई नाही. परंतु त्यातून काही तरी निष्पन्न व्हायला पाहिजे. ४ काम गावकीची आहेत तीच काम पूर्ण करायची आहेत. जिथे पाईपलाईन टाकायची आहे ती पाईपलाईन गावकीसाठी टाकतो. पाईपलाईनला खर्च कमी पडत असेल आणि आपण हेड वाढवला तर काय चूकले. फिगर बदलली तर आपले काय चूकले. बोलायला काय हरकत नाही. चर्चा करु द्या सगळ्या ९५ नगरसेवकांना बोलू द्या. पण त्यातल तथ्य एवढेच आहे ह्याच्यात चूक होते किंवा काय होते. सचिवांना

अंडरप्रेशर करण्यात काही अर्थ नाही. सन्मानाने हा अर्थसंकल्प मांडलेला आहे. सभागृहाने एक मताने त्याला मंजूरी द्यावी ही विनंती.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, अभी काकाने बोला है कोई भी फिगर चेंज करने के लिए महासभा को अधिकार है। यह हम मानते है। यह सभा महासभा जो भी होती है नियम के अनुसार चलनी चाहिए नियम को छोडकर चलाऐंगे तो मैं समझता हूँ महासभा का अपमान होगा। आपने १०० के हिसाब से कहाँ हमने सभा कामकाज प्रकरण २ "३" के ल के नियम अनुसार कहा है। अगर आप "ल" को नहीं मानते हो तो इस महासभा में सचिव साहब बता दे की नियम के अनुसार हम नही मानते है। महासभा को फेरफार करने का अधिकार है लेकिन कूछ नियम है।

**जुबेर इनामदार :-**

"ल" ला मान्यता नसेल तर "आय" लाही मान्यता नाही. "ल" मध्ये "आय" चा उल्लेख आहे. "आय" स्पष्ट बोलतो सभा लावा. १००,१०१,१०२,१०५ पूर्ण अधिनियम महासभाच नसली सभा कामकाजच नसेल तर सर्व अधिनियमाचे करणार काय? "ल" मधला "आय" काय बोलतो. प्रत्येक महिन्याच्या महानगरपालिकेची निदान एक तरी सर्वसाधारण सभा भरवण्यात आली पाहिजे आणि ती महिन्याच्या २० तारखेच्या आत भरवण्यात आली पाहिजे. "ल" मध्ये त्याचा उल्लेख आहे. सभा कामकाजाला मान्यता देणार नसाल तर महासभेचा अर्थच राहत नाही.

**भगवती शर्मा :-**

आम्ही जे प्रश्न विचारले तर सचिवांना सांगू द्या.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्याला विनंती करतो अनेक असे आहेत जो बजेट ध्रुवकिशोर पाटीलनी मांडला आहे. ती फिगरच मॅच होत नाही. ऑलरेडी चेंजेस झाले आहे. ते मांडायचे त्याला ऑडीटच्या मुद्दयापासून सगळे उपस्थित राहणार अनेक लोक अडचणीत येणार ३१ मार्चच्या अगोदर हा बजेट मंजूर करायला पाहिजे होता ही कायद्यात तरतूद होती ना आता काही कारणाने राहीला ना. मॅडम मधल्या काळात आपण प्रॉपर्टी कनेक्शन केले जी सिव्हरेजची लाईन त्याची तरतूद फक्त २२ कोटी होती तो टेंडर गेला ५४ कोटीला आपल्याला काय वाटले सुधारणा करायला नको आणि नाही केले तर प्रॉपर्टी कनेक्शनचे काम बंद करायचे २२ चे ५४ सुधारणा करायला नको. महासभा नाही करणार तर कोण करणार.

**भगवती शर्मा :-**

नियमाप्रमाणे करा.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम आम्ही जे काही सुचवले आहे. आम्हाला जेवढे नियमाचे ज्ञान आहे त्या माध्यमातून आम्ही आमचा ठराव मांडलेला आहे. शेवटी मी आपल्याला विनंती केली की सभागृहाचा वेळ घालवण्यापेक्षा आम्ही आमच्या ठरावात बदल करायला इच्छूक नाहीत. साहेबांनी ठराव मांडलेला आहे आपण त्याच्यावर मतदान घ्या. प्रशासनाला जे योग्य वाटेल जे नियमात असेल आमच्या ठरावाप्रमाणे कारवाई करतील त्यांच्या नियमात असेल त्याच्या ठरावाप्रमाणे कारवाई करतील.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, "ज" चा प्रस्ताव नसला तर ठराव नियमबाह्य करता येईल का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दोन ठराव आलेले आहेत आम्ही सभा कामकाज प्रकरण क्र. ०२ "ल" प्रमाणे मांडले आहे. आणि विरोधी पक्षनेत्यांनी १०० नंबर प्रमाणे मांडले आहे. दोन ठराव वेगवेगळे आले आहेत. माझी तुम्हाला विनंती आहे की हे दोन्ही ठराव शासनाकडे पाठवा. त्यांच्याकडून अभिप्राय मागवा त्यांचे म्हणणे काय आहे त्याप्रमाणे शासन म्हणेल ते मान्य करा अशी माझी विनंती आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आपण नक्की पाठवा पण सभागृहामध्ये एकाला निर्णय देऊन मग आपल्याला रिफर करायला लागेल. डायरेक्टली आपण पाठवू शकत नाही म्हणजे सभेत ठरावच झाला नाही.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, नियमाप्रमाणे दोन ठराव आलेले आहेत. ठरावावर मतदान घ्या.

**भगवती शर्मा :-**

हमने जो "ल" के हिसाब से ठराव किया है आप अपना मत बताईए।

**नगरसचिव :-**

सभागृह १०० प्रमाणे ठराव मांडू शकतो.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब प्रस्ताव में बदल करु शकतो पण "ल" प्रमाणे ना.

**नगरसचिव :-**

१०० मध्ये पण तसे क्लिअर म्हटले आहे बदल करु शकतो.

**नरेंद्र मेहता :-**

१२ वर्षात १२ महिने फेरबदल झाले.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही आम्हाला सांगा.

**नगरसचिव :-**

१०० मध्ये घट वाढ करण्याचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दोन ठराव आलेले आहेत मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

मतदान घेऊन निर्णय घ्या.

**भगवती शर्मा :-**

सभेचा अंतिम निर्णय म्हणजे ''ल'' प्रमाणे ना. तुम्ही कामकाज नियम मानत नाही का?

**नगरसचिव :-**

मी अधिनियमाप्रमाणे बोलतो.

**भगवती शर्मा :-**

नियम नाही का?

**नगरसचिव :-**

अधिनियम श्रेष्ठ.

**जुबेर इनामदार :-**

''ल'' हा अधिनियमाचा भाग आहे ना.

**नगरसचिव :-**

अधिनियमाला अवलंबून त्यांनी उपनियम तयार केले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब उपविधी प्रमाणे आहे तर आपल्याला त्याच्यावर चर्चा करायला लागेल. उपविधी काय आहे कूठून आली कशी आली.

**नगरसचिव :-**

अधिनियमाला अनुसरुन कसे कामकाज करायचे त्याची उपविधी तयार केले आहे.

**जुबेर इनामदार :-**

अधिनियमामध्ये सभा कामकाज आहे ते तुम्हाला मान्य आहे की नाही.

**नगरसचिव :-**

सभा कामकाज चालते ना. सभागृहाने अंतिम निर्णय घ्या. दोन ठराव आले आहेत. मतदान घेऊन निर्णय घ्यायचा आहे.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम दोन ठराव आल्यावर मतदान घेता. मतदान घ्या.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, आजपर्यंत ह्या बजेटमुळे बरेचसे विषय की, मिरा भाईंदरच्या विकासाची बरीचशी कामे रखडली आहेत. आणि प्रत्येक वेळी अधिकाऱ्याकडे गेल्यानंतर बजेट नसल्यामुळे काम होत नाही. अशी आम्हाला उत्तर मिळतात. विकासात्मक काम करायची आहे आपण ह्या सर्वांमध्ये महत्वाचा निर्णय देऊन ह्यावर निर्णय द्यावा आणि आमच्या सहकारी नगरसेवकांना ह्या गोष्टीची कल्पना आहेच त्यांनी देखील ह्यामध्ये सहयोग करुन सर्वानुमते आपण मा. महापौर मॅडम ह्यांचा योग्य निर्णय घ्यावा अशी आपणास विनंती करते. त्यामुळे सगळ्यांचा वेळ देखील वाचेल.

**जुबेर इनामदार :-**

अर्थसंकल्पाच्या आकड्यामध्ये बदल हा घडवणारा दुसरा ठराव आहे. तो नियमीत आहे का? मा. महापौर मॅडम विधी विभागाचा अभिप्राय घ्यावा. कारण विषय कसा आहे दुसरा ठराव मांडू शकता. दुसरा ठराव मांडायला एक ठराव सभागृहाचा अधिकार आहे तो विरोधी पक्षाचा अधिकार आहे. आता त्या विषयावर आकड्यामध्ये बदल घडवायचा हा ठराव हा नियमबाह्य तर नाही. तर आम्हाला त्याच्या विरोधात मतदान करायचे आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, यह महासभा नगरसचिवने बुलाई है। यह सभा नगरसचिव के अनुरोध से आ गई है। यहाँ पर जो होगा बहुमत से होगा। अगर किसीको आपत्ती है नियमविरुध्द सभा बुलाई गई है तो आप

प्रशासन को दर्ज करते है। अभी जब महासभा बैठ गई है तो यहाँ पर बहुमत से काम होगा। अगर कोई टेक्नीकल फॉल्ट है तो आप पहले मिलते या बाद में करते। महासभा आ गई है बाकी सब नगरसेवक बैठे है वो नगरसचिव के अनुरोध से आए है उसको करना नियम विरुध्द है।

**भगवती शर्मा :-**

पहले तो उनको यह क्लिअर कर देता हूँ की, यह महासभा नगरसचिव के आदेश से नही चलती है। नगरसचिव महापौर के आदेश से चलाते है। हमारा एक ही प्रश्न है जो जुबेर इनामदार ने कहाँ है वही हम कह रहे है। अगर नगरसचिव को मन में शंका है तो आप किसीसे राय मशवरा ले लिजीए।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, सचिवांचे जे काही मत आहे ते मत मांडले तरी आम्ही आमचा ठराव मांडलेला आहे. नगरसचिवांनी जसा विषय आणल्यानंतर महापौरांनी तो विषय सादर केलेला आहे. आणि महापौरांनी एखादा विषय आणल्यानंतर सभागृह श्रेष्ठ असतो. सभागृहाने घेतलेल्या निर्णयावर आपला निर्णय एखादे टेक्नीकली आपल्याला वाटते तर कायद्यात तशी तरतूद आहे ४०१ मध्ये जसे मागच्या वेळी आम्ही मांडलेल आपल्याला टेक्नीकली वाटल आपण पाठवले शासनानी त्याला निलंबित केले. मधल्या काळात सभा लागली नाही. आम्ही शासनाकडे गेलो शासनानी परत आपल्याला निर्देश दिले इकडे सचिवांनी सांगून सभागृह बदलत नाही ना. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना "ल" बरोबर वाटते तरी आम्हाला १०० प्रमाणे बरोबर वाटते आम्ही १०० प्रमाणे मांडलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, भगवतीजीना जे उत्तर हव आहे ते मिळाले आहे. त्यांना कायद्यानी द्यायचे आहे ते दिले आहे. यदी उनको लगता है यह कामकाज गलत है तो वो उपर न्याय मांग सकते है। ज्यांना मुद्दाच उभा केला नसता तर गोष्ट वेगळी आहे. त्यांनी मांडलेला आहे रेकॉर्डींग झालेले आहे. सचिवांनी त्यांना समजदारीचे उत्तर दिलेले आहे. आता महापौर म्हणून तुम्ही त्यांना सांगायचे एक मताने ठराव मंजूर नसेल तर बहुमतानी ठराव मंजूर. साधे कामकाज आहे.

**भगवती शर्मा :-**

हम शांतीपूर्व चाहते है उनको नॉलेज है। किताब में पढा है उस किताब में चूक हो गई है तो सुधारेंगे। इसलिए उपर जाने के पहले इधर पूछेंगे सचिव के बाद विधी विभाग है, मा. आयुक्त है। पहले यहाँ समाधान नही होता है तो आगे उपर भी जाएंगे। लेकिन हमको समाधान तो करने दिजीए।

**सुरेश खंडेलवाल :-**

सचिव साहब नियम बडा होता है की उपनियम बडा होता है। नियम पहले बना की उपनियम पहले बना।

**नगरसचिव :-**

अधिनियम पहले उपनियम बाद में.

**सुरेश खंडेलवाल :-**

अधिनियम पहले उपनियम बाद में। आपके बोलने का मतलब यह है उपनियम के अंदर जो "ल" में मुद्दे है वो बादमें बने है। इसका निष्कर्ष एक ही है यह मुद्दा मा. आयुक्त की मंजूरी से बाद में उपर जाएगा। क्या डिसीजन होगा यह सब पेंडीग मॅटर है। एक ही नियम के अंदर २-२ मुद्दे एक १०० है एक "ल" है। लास्ट में मा. आयुक्त को डिसीजन लेना है। अगली बार ऐसा मुद्दा बन जाएगा की महासभा सुप्रीम है बात सही है महासभा सुप्रीम है लेकिन यह "ल" भी है। उपनियम क्यों बनाया। ऐसे एक ही बूक के अंदर २-२ आदेश कैसे? पहले आपने नियम बनाया उसको तोड दिया। पहले नियम बनाया १०० नंबर का की महासभा सुप्रीम है।

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकाचे सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या मंजूरीच्या विषयावर दोन ठराव सभागृहात मांडण्यात आलेले आहेत तरी एक ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ प्रमाणे आहे. तर दुसरा ठराव अधिनियमाप्रमाणे नसल्याने सदरचे ठराव अभिप्राय घेण्यासाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात यावे. तद्नंतर त्यावर योग्य निर्णय घ्यावे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आपण राज्य शासनाकडे पाठवा आमची काही हरकत नाही. पण दोन ठराव आल्यामुळे आपल्याला नियमाप्रमाणे बहुमतानी किंवा संगनमतानी आपल्याला मंजूर करायला लागेल त्यानंतर जिकडे पाठवायचा तिकडे पाठवू शकता. पण आपल्याला सभागृहात एक ठरावावर निर्णय द्यावाच लागेल.

**मा. महापौर :-**

सभा संपली असे मी जाहिर करते.

(भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सदस्य सकाळी ११.४५ वाजता सभागृहा बाहेर गेले.)

**शरद पाटील :-**

नियमानुसार दोन ठराव आलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

सभा संपलेली नाही निर्णय झाला नाही आपल्याला बसायला लागेल.

**मा. महापौर :-**

मा. महापौरांनी आदेश दिलेला आहे. सभा संपली आहे.

**शरद पाटील :-**

नियमानुसार दोन ठराव आल्यानंतर मतदान करायला लागते. ते मतदान झाले पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय सभेचा निर्णय अजून झालेला नाही. निर्णय झाल्याशिवाय सभा संपत नाही. दोन ठराव आलेले आहेत. सचिव साहेब जाता येणार नाही. सभा कामकाज शिस्तीचे आपल्याला पालन करायला लागेल.

**नगरसचिव :-**

मा. महापौरानी आदेश दिलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

महापौरांनी अनेकदा असे आदेश दिले त्यानंतर काय होत नाही.

**शरद पाटील :-**

ह्याच्या अगोदर पण असे झाले आहे त्यानंतर मिटींग चालू झाली आहे.

**प्रविण पाटील :-**

सचिव साहेब पिठासीन अधिकारी नियुक्ती करा.

**नरेंद्र मेहता :-**

सभा संपूच शकत नाही. सभागृहाला निर्णय देऊन जावे लागेल. मा. महापौरांना अति महत्वाच्या कामासाठी गेल्याने सभापती महोदय प्रशांत केळुसकर ह्यांना पिठासीन अधिकारी म्हणून हे सभागृह नेमणूक करत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

(पिठासीन अधिकारी म्हणून श्री. प्रशांत केळूसकर स्थानापन्न झाले.)

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहाचे कामकाज चालू आहे. शितोळे साहेब एक जण बसा दोघांपैकी. सभागृहाचे कामकाज चालू आहे उपायुक्तांना बसवा. आम्हाला पाहिजे.

**प्रशांत केळूसकर (पिठासीन अधिकारी) :-**

पानपट्टे साहेब प्रशासनाच्या जागेवर आपण बसावे. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब महासभेत अशाप्रकारे दोन ठराव आल्यानंतर सभा सर्वानुमते किंवा बहुमताने तहकुब करुन ती पेंडींग ठेवता येते. एखादा वेळ संपली की ती तहकूब करुन दुसरी तारीख देता येत असते. दोन विषयपटलावर असल्याने मनमानी कारभार चालवून सभा संपली असे बोलून जाता येत नाही. हे कायद्यात स्पष्ट आहे वेळ संपल्यापर्यंत बहुमत किंवा सर्वानुमते केल्यानंतरच ती सभा संपली जाते किंवा तहकुब केली जाते. आता कोणतही प्रकारचा तहकुबीचा ठराव आलेला नाही वेळ संपली नाही. आणि मा. महापौरांनी कोणते काम असेल तर त्या गेल्या असतील. मी मा. महापौराना विनंती करतो. आपल्याकडे दोन ठराव आले आहेत ते दोन्ही ठराव गरज पडल्यास मतदानास टाकावे आणि ठरावावर निर्णय द्यावा अशी विनंती.

**प्रशांत केळूसकर (पिठासीन अधिकारी) :-**

सचिव साहेब ठरावाचे वाचन करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण ६२ करिता दोन ठराव आले होते. पहिला ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार, दुसरा ठराव सुचक श्री. नरेंद्र मेहता, अनुमोदन श्री. प्रशांत दळवी अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**प्रशांत केळूसकर (पिठासीन अधिकारी) :-**

दोन ठराव आलेले आहेत. एक ठराव श्री. नरेंद्र मेहता दुसरा श्री ध्रुवकिशोर पाटील. श्री. नरेंद्र मेहता ह्यांचा ठराव बहुमताने मंजूर.

**प्रकरण क्र. ६२ :-**

सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मूळ अर्थसंकल्पास मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. ४८ :-**

**लेखाशिर्ष निहाय बदल करावयाचा रकमा** **रू.लाखात**

| अ.क्र | लेखाशिर्ष | मा.महासभा अंदाज (२०१४-१५) | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक स्मशानभुमी व दफनभुमी दुरूस्ती | ६५.०० | ३३ |
| २ | मनपा सार्वजनिक इमारती दुरूस्ती व इतर कामे | ८०.०० | ३५ |
| ३ | सार्वजनिक रस्ते देखभाल / दुरूस्ती/पुर्नः पृष्ठीकरण | ३७००.०० | ३५ |
| ४ | सार्व.शौचालय व मुतारी दुरूस्ती | २३०.०० | ३५ |
| ५ | सर्वधर्मिय उत्सव मंडप / लाईट व इतर व्यवस्था | ३००.०० | ३५ |
| ६ | गटारे दुरूस्ती झाकणे बसविणे | ३५०.०० | ३५ |
| ७ | सार्वजनिक इमारती/ सिग्नल (विद्युत विजबिल) | १५०.०० | ३९ |
| ८ | मार्केट बांधकाम | १४०.०० | ४१ |
| ९ | नविन रस्ते बांधकाम | १५००.०० | ४२ |
| १० | नविन गटारे / नाले बांधकाम | ८५०.०० | ४२ |
| ११ | वाचनालय विकास | १५.०० | ४२ |
| १२ | जेसलपार्क सब-वे / पोच रस्ते | १८५०.०० | ४२ |
| १३ | त्रयस्थ लेखापरीक्षण फी | ५३.०० | ४२ |
| १४ | स्पोटर्स क्लब व इतर कामे | ७००.०० | ४२ |
| १५ | भाईंदर (पूर्व/प.),मिरारोड स्टेशन बाहेर सुशोभिकरण करणे | २५०.०० | ४३ |
| १६ | स्टेडीयम/ क्रीडा संकुल विकसित करणे | ७५.०० | ४४ |
| १७ | कम्युनिटी सेंटर | १००.०० | ४४ |
| १८ | भाईंदर (प) रुग्णालय बांधकाम (टेंबा हॉस्पिटल) | ३००.०० | ४१ |
| १९ | सिग्नल यंत्रणा / सी.सी.टी.व्ही.बसविणे (नविन विद्युत कामे) (रेल्वे स्टेशन /स्मशान भुमी/प्रभाग कार्यालय ) | ५०.०० | ४४ |
| २० | नविन स्ट्रीट लाईट/हायमस्ट (नविन विद्युत कामे) | २०.०० | ४४ |
| २१ | विजबिलाचा खर्च(पथदिवे)(विद्युत विजबिल) | १८००.०० | ३९ |
| २२ | सार्व. इमारती/ सिग्नल /जनरेटर/सी.सी.कॅमेरा दुरूस्ती (विद्युत दुरूस्ती) | ३५.०० | ३९ |
| २३ | सार्वजनिक इमारती (नविन विद्युत कामे) | २५.०० | ४४ |
| २४ | ऐतिहासिक स्मारके | २५.०० | ४२ |
| २५ | सभापती स्वेच्छा निर्णय निधी | १००.०० | ३७ |
| २६ | दशक्रीया विधी व इतर शेड बांधणे | १७५.०० | ४३ |
| २७ | वॉर्ड साफसफाई | ४९२०.०० | ३१ |
| २८ | वैद्यकीय अस्थायी आस्थापना | १५०.०० | ३२ |
| २९ | रुग्णालय फर्निचर / उपकरणे खरेदी करणे | ४००.०० | ४१ |
| ३० | एकात्मिक डास निर्मुलन योजना | २३०.०० | ३१ |
| ३१ | पाणी बील | ३७८०.०० | ४९ |
| ३२ | पंपींग व संपगृह विज देयक बिल | ४७०.०० | ५० |
| ३३ | टँकर भाडे | २८०.०० | ५० |
| ३४ | मलनिःसारण विज देयक | ४००.०० | ५० |
| ३५ | पा.पु. साहित्य खरेदी | १७०.०० | ५१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | नविन जलवाहिनी टाकणे | ११००.०० | ५१ |
| ३७ | नविन अतिरीक्त पाणी पुरवठा | ४३५०.०० | ५१ |
| ३८ | रस्ता नुकसान भरपाई (जमा) | ४२००.०० | १८ |
| ३९ | शाळा इमारत दुरूस्ती,निगा (शिक्षण) | १२०.०० | ५ |
| ४० | संगणक प्रशिक्षण (शिक्षण) | ४४.०० | ५ |
| ४१ | वर्ग सुरू करणे /शैक्षणिक साहित्य (शिक्षण) | १.०० | ५ |

## आर्थिक व प्रशासकिय मंजुरी

| अ. क्र. | कामाचे | मुळ मान्यता | सुधारीत मान्यता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | गायमुख ते चेणा दरम्यान सध्यांच्या जलवाहिनीस समांतर १३५० मि.मी. व्यासाची एम.एस. पाईप लाईन टाकणे. | रू. १७,८०,५४,६७५/- | रू. २२,०२,२८,७१२/- | मंजूर निविदा अंदाजपत्रकापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा व भाववाढ |
| २ | हटकेश ते शामराव विठ्ठल बँकेपर्यंत १०६७ मि.मी. व्यासाची एम.एस. पाईप लाईन टाकणे | रू. ६,०३,६७,२१६/- | रू. ७,००,०२,६८८/- | मंजूर निविदा अंदाजपत्रकापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा व भाववाढ |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका वाढीव पाणी पुरवठा योजना (एम.आय.डी.सी. स्त्रोत) | रू. २६९,६२,००,०००/- | - | |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत संकल्पचित्र व संकल्पन तयार करून मालमत्तेची मलःनिस्सारण जोडणी करणे | रू. २२,४५,००,०००/- | रू. ५४,४०,६३,७१५/- | सदरच्या कामाची निविदा ही सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार मागविण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे दरापेक्षा १४५% जास्त दराची आहे. |

अ.क्र. १,२,३ करीता वार्षिक अंदाजपत्रक सन २०१४-१५ पृ. क्र. ५१, बाब क्र. ०६ नवीन अति. पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षकाखाली तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी अ.क्र. १ व २ या कामांना सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अ.क्र. ३ वाढीव पाणी पुरवठा योजना एकूण खर्च रू. २६९.६२ कोटी खर्चास सदर योजना शासनाच्या नगरोत्थान अभियांनातंर्गत मंजुरीसाठी शासनास पाठविणेसाठी, तसेच या योजनेंतर्गत ५० टक्के रक्कम शासकीय अनुदान आहे व ५० टक्के रक्कम मनपा हिस्सा आहे. मनपा हिस्सापैकी ८० टक्के कर्ज स्वरूपात निधी उभा राहवयाचा आहे व २० टक्के मनपाच्या खर्चातून करावयाचा आहे.

महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात सन २०१४-१५ पृ.क्र. ६१ अ.क्र. ०१ जेएनएनयुआरएम मनपा हिस्सा या लेखाशिर्षखाली अ.क्र. ०४ मधील कामास सुधारीत प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

## कामाची यादी

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्ता ते कनकिया रस्ता जोडणारा ३०.०० मीटर डी.पी रस्ता तयार करणे व गटारे बांधणे (तिवारी कॉलेज समोरील) | रु. ७,००,५०,६००/- |
| २ | हटकेश येथील श्री. ॲव्हेन्यु ते वेस्टर्न पार्क (स.क्र. ९० ते १३२, घोडबंदर) पर्यतचा रस्ता तयार करणे व गटारे बांधणे | रु. ५,८१,५८,०००/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १० मधील ओम पुष्पक ते मणीभद्र इमारती पर्यत नाल्याची पुर्नबांधणी करणे | रु. ४०,२५,५५५/- |
| ४ | भाईंदर (प.) टेंबा हॉस्पीटल इमारत बांधणे. मुळ सुधारीत अंदाजपत्रक | रु. १३,८१,८५,५७५/-<br>रु. २२,७८,२५,५००/- |

| | | |
|---|---|---|
| | सुधारीत अंदाजपत्रक (सदर सुधारीत अंदाजपत्रकानुसार काम मुळ कंत्राटदाराकडुन काम करुन घेण्यात यावे. सदर काम तातडीने पुर्ण करावयाचे असल्याने मुळ कंत्राटदारास काम सब लेट करण्यास परवानगी देण्यात येत आहे.) | |
| ५ | टेंबा हॉस्पीटल मध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणे, हाऊसकिपींग, लॉड्री, वैद्यकिय यंत्र सामुग्री खरेदी करणे इत्यादीसाठी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देणे | रु.२,००,००,०००/- |

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ चे मुळ अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मा. स्थायी समितीने मंजूर केलेले सुधारीत व मुळ अंदाजपत्रकात काही दुरुस्त्या करुन मा. महासभा सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ च्या मुळ अंदाजपत्रकास ही सभा मंजुरी देत आहे.

| **तपशिल** | **२०१३-१४ (सुधारित अंदाज)** | **२०१४-१५ (मुळ अंदाज)** |
|---|---|---|
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" = एकूण जमा | १२२७.३१ | ५७०७.६४ |
| "महसुली" + "भांडवली" + "असाधारण" = एकूण खर्च | ८२७.२१ | ५६९२.१६ |
| **अखेरची शिल्लक** | ४००.१० | १५.४८ |

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मा. आयुक्त सो. यांनी सादर केलेल्या मुळ अंदाजपत्रकात काही दुरूस्त्या करून मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकात सुधारित व मूळ अंदाजपत्रकामध्ये वरीलप्रमाणे सुधारणा करून सन २०१३-१४ चे सुधारित व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सन २०१३-१४ चे सुधारित अंदाज व सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रक**

**(आकडे लाखात)**

| **तपशिल** | **२०१३-१४ (सुधारित अंदाज)** | **२०१४-१५ (मुळ अंदाज)** |
|---|---|---|
| **एकूण जमा** | **९१००४.२७** | **१२५४५०.७३** |
| **एकूण खर्च** | **७९६०७.१२** | **१२५४२५.७८** |
| **अखेरची शिल्लक** | **११३९७.१५** | **२४.९५** |

**सूचक - श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन - श्री. प्रशांत दळवी**

| **अ.क्र.** | **ठरावाच्या बाजूने** | **ठरावाच्या विरोधात** | **तटस्थ** |
|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | **निरंक** | **निरंक** |
| २ | शरद केशव पाटील | | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | | |
| ४ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | | |
| ६ | भानुशाली वर्षा गिरीधर | | |
| ७ | मीरादेवी रामलाल यादव | | |
| ८ | कोठारी सुमन रमेश | | |
| ९ | डॉ. नयना मनोज वसानी | | |
| १० | सिमा कमलेश शहा | | |
| ११ | जैन गिता भरत | | |
| १२ | अरोरा दिपिका पंकज | | |
| १३ | रावल भगवती जयशंकर | | |
| १४ | मेहता डिंपल विनोद | | |
| १५ | मेघना दिपक रावल | | |
| १६ | शर्मा सुनिला सत्येंद्र | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | | |
| १८ | सुजाता रविकांत शिंदे | | |
| १९ | पाटील प्रेमनाथ गजानन | | |
| २० | सिंग मदन उदितनारायण | | |
| २१ | कांगणे यशवंत ठकाजी | | |
| २२ | अनिल बाबुराव भोसले | | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | | |
| २४ | जैन दिनेश तेजराज | | |
| २५ | जैन रमेश धरमचंद | | |
| २६ | डॉ. राजेंद्र जैन | | |
| २७ | निलम हरिश्चंद्र ढवण | | |
| २८ | तारा विनायक घरत | | |
| २९ | शुभांगी महिन कोटियन | | |
| ३० | जयमाला किशोर पाटील | | |
| ३१ | परमार अनिता भरत | | |
| ३२ | पाटील प्रणाली संदिप | | |
| ३३ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | |
| ३४ | संध्या प्रफुल्ल पाटील | | |
| ३५ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ३७ | हरिश्चंद्र आमगावकर | | |
| ३८ | प्रविण मोरेश्वर पाटील | | |
| ३९ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | |
| ४० | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ४१ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ४२ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ४३ | भोईर राजू यशवंत | | |
| ४४ | जाधव मोहन महादेव | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रशांत केळूसकर (पिठासीन अधिकारी) :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपण्याची वेळ दु. १२.०० वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**